६/०७/२०१६

# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि.ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( ________________ विभाग)

क्रमांक :

तारीख :

विषय स्थायी समिती सभा
दि.०८/७/२०१६

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
| --- | --- |
| | (१६) |
| | १५/१६ |

### अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- | --- |
| | (अ / ब / क / त-१ / ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०४/०१/२०१६.

## <u>मा. स्थायी समिती सभा</u>

**सभा सूचना क्र. :- १६ दिनांक ०४/०१/२०१६**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ____________________

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. ०८/०१/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १६, दि. ०४/०१/२०१६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी संदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

**(हरेश ल. पाटील)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा सुचना क्रमांक १६, दि. ०४/०१/२०१६ सोबतची विषय पत्रिका
## सभा शुक्रवार दि. ०८/०१/२०१६

| प्रकरण क्रमांक | विषय |
| --- | --- |
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत –** |
| १२१ | दि. ०५/०९/२०१५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज -** |
| १२२ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे नवघर येथील ओस्तवाल ॲव्हेन्यु ते शुभ चिंतन हाईट्स पर्यंतच्या रस्त्यावर नविन बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. (पाणी पुरवठा विभाग) |
| १२३ | तत्कालीन बडतर्फ करण्यात आलेले जनसंपर्क अधिकारी श्री. सचिन चवाथे यांनी मा. स्थायी समिती सभेपुढे दाखल केलेल्या अपील प्रकरणी प्रशासनाचे म्हणणे ग्राह्य धरुन निर्णय घेणेबाबत. |
| १२४ | ASRTU यांचे दर करारानुसार Electronic Ticketing Machine खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत. |
| १२५ | भाईंदर (प.) राईगांव येथील मैदानासमोर तळ + १ मजल्याचे रंगमंच बांधकाम करणेच्या सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. |
| १२६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) साई दत्त तलाव (सुकाळ तलाव) येथील कुंपणभिंत बांधणेबाबत. |
| १२७ | भाईंदर (पूर्व) नवघर मराठी शाळेच्या आवारामध्ये आरोग्य केंद्राचे बांधकाम करणे या कामास प्रशासकीय व ऑथक मान्यता देणे. |
| १२८ | निविदांना मान्यता देणे. (बांधकाम विभाग) |
| १२९ | निविदांना मान्यता देणे. (बांधकाम विभाग) |
| १३० | निविदेस मान्यता मिळणेबाबत. (नगरसचिव विभाग) |
| १३१ | मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग) |
| | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** - निरंक |

दिनांक :- ०४/०१/२०१६.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## पाणी पुरवठा विभाग

### मा. स्थायी समिती सभा दि. ०८/०७ /२०१६.

### ।। गोषवारा ।।

७२२
**प्रकरण क्र.:-** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे नवघर येथील ओस्तवाल ॲव्हेन्यु ते शुभ चिंतन हाईट्स पर्यंतच्या रस्त्यावर नविन बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. (पाणी पुरवठा विभाग)

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे नवघर येथील इंद्रलोक परिसरातील ओस्तवाल ॲव्हेन्यु ते शुभ चिंतन हाईट्स विकास योजना रस्त्यावर महानगरपालिकेची जलवाहिनी अस्तित्वात नाही. सदर परिसरात इमारतीचा विकास मोठया प्रमाणात होत असल्याने सदर विकास योजना रस्त्यावर जलवाहिनी अंथरणे आवश्यक वाटते. भविष्यात नळजोडण्या सुरु झाल्यास सदर इमारतींना पाणी पुरवठा करणे सोयीचे होईल. तरी सदर ठिकाणी पाण्याची नविन जलवाहिनी टाकणे आवश्यक आहे.

सदर कामी रू.३५,०२,२००/- इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. तरी वरील काम अत्यावश्यक असल्याने आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

D:\...\2015-16\Goshwara - Ostwal Avenue to Shubhchintan Heights.doc

~~प्रस्ताव~~
प्राप्त दि १७-१२-२०१९
~~वेळ~~ १-२० मि.

गोषवारा प्राप्त दि.१८/१२/२०१९ वेळ .........
मा. स्थायी समिती / ~~महासभा~~ गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र.... ४.१० ..........

लिपीक
नगरसचिव विभाग.

सामान्य प्रशासन विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.स्थायी समिती दि.०८/०१/२०१६

// गोषवारा//

संदर्भ :- मा.सभापती, स्थायी समिती सभा यांचे पत्र क्र. मनपा/स.स्था.स./२०१४-१५-४० दि.२७/०५/२०१४.

प्रकरण क्र.१२३:- तत्कालीन बडतर्फ करण्यात आलेले जनसंपर्क अधिकारी श्री.सचिन चवाथे यांनी मा.स्थायी समिती सभेपुढे दाखल केलेल्या अपील प्रकरणी प्रशासनाचे म्हणणे ग्राह्य धरुन निर्णय घेणेबाबत.

श्री.सचिन चवाथे यांना यापुर्वी महानगरपालिकेच्या आस्थापनेवर "जनसंपर्क अधिकारी" या पदावर स्थायी स्वरुपात सरळसेवेने, विहित निवडप्रक्रियेद्वारे दि.२४/०१/२०११ रोजी नियुक्ती केलेली होती. सदरचे अधिकारी यांचे पटणा विश्वविद्यालय, पटणा यांचेकडील "जर्नलिझम ॲन्ड मास कम्युनिकेशन" या अभ्यासक्रमाची पदवी प्रमाणपत्र पडताळणीअंती खोटी असल्याचे आढळून आल्याने तत्कालीन आयुक्तांनी श्री.सचिन चवाथे यांना दि.०२/०८/२०११ रोजीच्या आदेशान्वये सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले आहे.

सदरच्या बडतर्फीच्या आदेशाच्या विरुध्द श्री.सचिन चवाथे यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका (याचिका क्र.७२८०/२०११) दाखल करुन प्रकरण न्यायप्रविष्ठ केले होते. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने याचिकादार यांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये अपील करण्याची तरतूद उपलब्ध असल्याने, सदरची याचिका हाताळण्यास नकार देउन दि.०९/१०/२०१३ रोजी निकाली काढलेली आहे.

या अनुषंगे याचिकादार श्री.सचिन चवाथे यांनी मा.सभापती, स्थायी समिती यांचे पुढे कामावर हजर करुन घेणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे. यावर मा.सभापती, स्थायी समिती यांनी प्रशासनास याप्रकरणी दि.२७/०५/२०१४ रोजीच्या पत्रान्वये अभिप्राय अपेक्षिलेले होते. या प्रकरणी मा. स्थायी समिती दि.२१/०८/२०१४ समोर प्रशासनाने वस्तुस्थिती अहवालासह म्हणणे मांडलेले आहे. तदनंतर मा.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड मधील प्रकरण दोन (के) अन्वये मा. स्थायी समिती सभा दि.१४/१०/२०१५ मध्ये प्रकरण १०३ अन्वये सदर प्रकरणी निर्णय घेण्यासाठी विषय घेण्यात आलेला होता. सदर सभेत ठराव क्र. ९९ नुसार सदर अपिल प्रकरणी निर्णय

घेण्यासाठी मा. महासभे पुढे सदर प्रकरण सादर करण्यात यावे असा ठराव पारीत झालेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ५६ (४) अन्वये ज्या कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास महानगरपालिकेव्यतिरीक्त अन्य कोणत्याही प्राधिकाऱ्याकडून (सदर प्रकरणी आयुक्त हे प्राधिकरण असे) बडतर्फ करण्याचा आदेश देण्यात येईल, त्या अधिकाऱ्यास/ कर्मचाऱ्यास त्यांच्या निकट वरिष्ठ प्राधिकाऱ्याकडे (सदर प्रकरणी आयुक्तांचे निकट प्राधिकरण स्थायी समिती आहे.) अपील करण्याची तरतुद आहे. आणि सदर प्राधिकरणास आयुक्तांनी दिलेले आदेश कायम करता येईल. किंवा अशा आदेशा ऐवजी त्यास न्याय वाटेल असा आदेश देता येईल.

परंतु विषयांकित प्रकरणी मा.स्थायी समितीने वरील अधिनियमाच्या तरतूदीनुसार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिकेने दिलेले आदेश कायम केले नाहीत. किंवा सदर आदेशा ऐवजी इतर आदेश पारित केलेले नाहीत. किंबहुना सदर प्रकरणी निर्णय घेण्यासाठी मा.महासभेपुढे प्रकरण सादर केलेले आहे. वरील अधिनियमातील तरतुदीनुसार प्रस्तुत अपिलावर निर्णय घेणे मा.स्थायी समितीस अनिवार्य आहे. तरी प्रस्तुत अपिलावर दि.२१/०८/२०१४ रोजीच्या स्थायी समिती सभेपुढे प्रशासनाकडून वस्तुस्थिती अहवालासह मांडण्यात आलेले म्हणणे ग्राह्य धरुन निर्णय होणेस विनंती आहे.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

\\Atul-pc\e\आस्थापना विभाग\sadar\sadar-sachin chavathe.doc16

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती दि. २१/०८/२०१४ समोर प्रशासनाचे म्हणणे

संदर्भ :- मा.सभापती, स्थायी समिती सभा यांचे पत्र क्र. मनपा/स.स्था.स./२०१४-१५-४०
दि.२७/०५/२०१४.

प्रकरण क्र. :- तत्कालीन बडतर्फ करण्यात आलेले जनसंपर्क अधिकारी श्री.सचिन चवाथे यांनी मा.स्थायी समिती सभेपुढे दाखल केलेल्या अपील प्रकरणी प्रशासनाचे म्हणणे.

श्री.सचिन चवाथे यांना यापुर्वी महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ''जनसंपर्क अधिकारी'' या पदावर स्थायी स्वरुपात सरळसेवेने, विहित निवडप्रक्रियेद्वारे दि.२४/०१/२०११ रोजी नियुक्ती केलेली होती. सदरचे अधिकारी यांचे पटणा विश्वविद्यालय, पटणा यांचेकडील ''जर्नलिझम ॲन्ड मास कम्युनिकेशन'' या अभ्यासक्रमाची पदवी प्रमाणपत्र पडताळणीअंती खोटी असल्याचे आढळून आल्याने तत्कालीन आयुक्तांनी श्री.सचिन चवाथे यांना दि.०२/०८/२०११ रोजीच्या आदेशान्वये सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले आहे.

सदरच्या बडतर्फीच्या आदेशाच्या विरुध्द श्री.सचिन चवाथे यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका (याचिका क्र.७२८०/२०११) दाखल करुन प्रकरण न्यायप्रविष्ठ केले होते. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने याचिकादार यांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) अन्वये अपील करण्याची तरतूद उपलब्ध असल्याने, सदरची याचिका हाताळण्यास नकार देउन दि.०९/१०/२०१३ रोजी निकाली काढलेली आहे.

या अनुषंगे याचिकादार श्री.सचिन चवाथे यांनी मा.सभापती, स्थायी समिती यांचे पुढे कामावर हजर करुन घेणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे. यावर मा.सभापती, स्थायी समिती यांनी प्रशासनास याप्रकरणी दि.२७/०५/२०१४ रोजीच्या पत्रान्वये अभिप्राय अपेक्षिलेले आहे. या अनुषंगाने या प्रकरणी वस्तुस्थिती अहवाल पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहेः-

- श्री.सचिन चवाथे यांची ''रखवालदार'' या पदावर स्थायी स्वरुपात दि.०६/१२/२००३ रोजी प्रथम नेमणुक केलेली होती.

- श्री.सचिन चवाथे यांना ''जनसंपर्क अधिकारी'' यांचे सहाय्यक म्हणुन दि.२९/०१/२००९ रोजी कार्यभार दिलेला आहे. तसेच त्यांना दि.०६/०८/२००९ ते दि.०८/०९/२०१० रोजी पर्यंत ''जनसंपर्क अधिकारी'' या पदाचा प्रभारी कार्यभार सोपवला होता.

- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील ''जनसंपर्क अधिकारी'' व इतर प्रशासकीय पदे भरतीसाठी दि. २७/०८/२००९ रोजी दै. सकाळ, दै. मुंबई लक्षद्वीप या वृत्तपत्रात जाहीरात प्रसिद्ध केली होती.

- सदरच्या जाहिरातीमध्ये ''जनसंपर्क अधिकारी'' या पदाकरीता पुढीलप्रमाणे शैक्षणिक पात्रता अर्हता दिलेली होती.
  - (अ) शासनमान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.
  - (ब) पत्रकारीता व जन संज्ञापन (Journalism & Mass Communication) मधील पदविका प्रमाणपत्र आवश्यक.

(क) शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थेकडील सहा.माहिती व जनसंपर्क विभागातले अनुभव. प्रत्यक्ष पत्रकारीतेचे कामाचा ३ वर्षांचा अनुभव व जनसंपर्क या क्षेत्रातील विशेष कामगिरी असल्यास प्राधान्य.

- श्री.सचिन चवाथे यांना "जनसंपर्क अधिकारी" या पदाकरीता अर्ज करणेस दि.२२/०९/२००९ रोजी ना हरकत दाखला दिलेला होता.
- श्री. सचिन चवाथे, रखवालदार या पदावर महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत असुन त्यांनी "जनसंपर्क अधिकारी" या पदासाठी जाहीरातीनुसार अर्ज केला होता.
- अर्जाची छाननी आस्थापना विभागाकडील कर्मचाऱ्यांकडून करण्यात आली असुन अर्जासोबत दाखल केलेल्या प्रमाणपत्राचे आधारे दि.३०/०१/२०१० रोजी उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी टपालाने पत्रे पाठविण्यात आली.
- लेखी परिक्षा दि.२१/०२/२०१० रोजी घेण्यात आली. त्यानंतर लेखी परिक्षेचा निकाल दि.०९/०४/२०१० रोजी नोटीस बोर्डावर जाहीर करण्यात आला.
- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-१९४९ चे कलम ५४ (१) अन्वये गठीत निवड समितीद्वारे जनसंपर्क अधिकारी (श्रेणी-ब) पदाच्या लेखी परिक्षेस उत्तीर्ण उमेदवारांच्या दि.२४/०४/२०१० रोजी तोंडी मुलाखती घेण्यात आल्या.
- श्री. विनोद शेवंते, यांनी मा. उच्च न्यायालयात महानगरपालिके विरुद्ध श्री.सचिन चवाथे, यांचे प्रमाणपत्र शासनमान्य नाही. याबाबत दि.२४/०५/२०१० मध्ये प्रथम याचीका क्र.१३४९०/१० दाखल केली.
- अर्जदाराने दाव्यात नमुद पदावर नियुक्ती केलेली नसल्याने मा. न्यायालयाने सदरची याचिका दि.०९/०९/२०१० रोजी कोणताही निर्णय न देता प्रकरण निकाली काढले.
- दरम्यान महानगरपालिकेने जा.क्र.मनपा/आस्था/७०३/२०१०-११, दि.२४/०९/२०१० रोजी पटना विश्वविद्यालय पटना येथे श्री. सचिन चवाथे, यांनी कार्यालयास अर्जासोबत सादर केलेले शैक्षणिक पात्रतेचे "पत्रकारीता व जनसंज्ञापन" हे प्रमाणपत्र तपासणी करीता पाठविले.
- पटना विश्वविद्यालय, पटना यांचेकडील प्रमाणपत्र पडताळणीचे पत्र क्र.पी.यु.१०/२८४६, दि.२२/१२/२०१० रोजीचे दि.१०/०१/२०११ रोजी कार्यालयास टपालाने प्राप्त होऊन त्या पत्रान्वये प्रमाणपत्र सत्य असल्याबाबत कळविले आहे.
- पटना विश्वविद्यालय पटना यांचेकडील दि. २२/१२/२०१० रोजीचे दि. १०/०१/२०११ रोजी प्रमाणपत्र सत्य असल्याबाबतचे प्राप्त पत्रानुसार प्रशासनाने जा.क्र. मनपा/आस्था/११७१/२०१०-११, दि. २४/०१/२०११ अन्वये "जनसंपर्क अधिकारी" या पदावर श्री. सचिन चवाथे, यांना नियुक्ती आदेश दिले आहेत.
- श्री. सचिन चवाथे, यांना "जनसंपर्क अधिकारी" या पदाचे नियुक्ती आदेश दिल्याने दि. १५ मार्च २०११ दरम्यान त्यांच्या विरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्र.१८३१/२०११ अन्वये श्री. विनोद शेवंते, यांनी प्रकरण न्यायप्रविष्ठ केले.
- श्री. सचिन चवाथे, (जनसंपर्क अधिकारी) या पदावर देण्यात आलेल्या नियुक्तीस मान्यता देणेबाबत दि.२०/०४/२०११ रोजी विषय मा. महासभेमध्ये ठेवला असता मा. उच्च न्यायालयात

रिट पिटीशन क्र.१८३१/२०११ अन्वये जनसंपर्क अधिकारी हे पद न्यायप्रविष्ठ असल्याने न्यायालयाचे अंतिम निर्णयाचे अधिन राहुन मा. महासभेने ठराव क्र. १२ अन्वये मंजुरी दिली आहे.

➢ प्रकरण न्यायप्रविष्ठ झाल्याने महानगरपालिकेने फेर तपासणीकरीता "पत्रकारीता व जनसंज्ञापन" हे प्रमाणपत्र पटना विश्वविद्यालय पटना यांना जा.क्र.मनपा/आस्था/८२/२०११-१२, दि.२६/०४/२०११ अन्वये स्पिड पोस्टाने पाठविण्यांत आले.

➢ दि.२६/०४/२०११ रोजी पाठविण्यात आलेल्या दुसऱ्यांदा पत्रकारीता व जनसंज्ञापन हे प्रमाणपत्र पडताळणी करीता पाठविले असता ते योग्य असल्याचे महानगरपालिकेस जा.क्र.पीयु/६९११, दि.२०/०३/२०११ रोजीचे पत्र दि.०२/०६/२०११ रोजी टपालाने प्राप्त झाले.

➢ तत्पुर्वी महानगरपालिकेने जा.क्र.मनपा/आस्था/७०३/२०१०-११, दि.२४/०९/२०१० अन्वये श्री. सचिन चवाथे, (जनसंपर्क अधिकारी) यांचे प्रथम पत्रकारीता व जनसंज्ञापन पदवी प्रमाणपत्र व मार्कलिस्ट पडताळणीसाठी पाठविले होते. त्या पत्राचे पुन्हा पटना विश्वविद्यालय पटना यांचे पत्र क्र. ६७९९/परिक्षा, दि.२९/०४/२०११ रोजीचे कार्यालयास दि.१८/०५/२०११ रोजी प्राप्त आहे. सदर पत्रात महानगरपालिकेने दि.२४/०९/२०१० रोजी पत्रासोबत पाठविलेले प्रमाणपत्र व गुणपत्रिकेच्या छायाप्रती बाबत माहिती पटना विश्वविद्यालय पटना यांचे अभिलेख्यात दप्तरी नोंद नाही. *ती खोटी असल्याचे परिक्षा नियंत्रक यांचे स्वाक्षरीचे दि.२९/०४/२०११ चे दि.१८/०५/२०११ रोजी पत्र प्राप्त आहे.*

➢ अश्याप्रकारे महानगरपालिकेने दि.२४/०९/२०१० व दि.२६/०४/२०११ अन्वये दोन वेळा पटना विश्वविद्यालय पटना यांना पत्रकारीता व जनसंज्ञापन हे पदवी प्रमाणपत्र तपासणीसाठी पाठविले असता त्यांचे या कार्यालयास जा.क्र.पियु/१०/२०४६, दि.२२/१२/२०११ रोजीचे दि. १०/०१/२०११ रोजी व जा.क्र.पीयु/६९११, दि.२०/०३/२०११ रोजीचे दि.०२/०६/२०११ रोजी महानगरपालिकेस प्राप्त पत्रान्वये प्रमाणपत्र योग्य असल्याचे नमुद आहे.

➢ दरम्यान प्रमाणपत्र खोटे असल्याचे पटना विश्वविद्यालय, पटना यांचे जा.क्र.६७९९/परिक्षा, दि.२९/०४/२०११ रोजीचे महानगरपालिका कार्यालयास दि.१८/०५/२०११ रोजी प्राप्त पत्रानुसार महानगरपालिकेने जा.क्र.मनपा/आस्था/७०३/२०१०-११, दि.२४/०९/२०१० अन्वये श्री. सचिन चवाथे, यांचे पत्रकारीता व जनसंज्ञापन पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रिका यांच्या छायाप्रती पटना विश्वविद्यालयाचे अभिलेख्याशी पडताळणी करता त्यांच्या नोंदी नाहीत म्हणजे प्रमाणपत्र खोटे असल्याचे नमुद केले आहे.

➢ पत्रकारीता व जनसंज्ञापन पदवी प्रमाणपत्र खोटे असल्याचे दि.१८/०५/२०११ रोजीचे पटना विश्वविद्यालयाचे प्राप्त पत्राचे अनुषंगाने महानगरपालिका प्रशासनाने मा. आयुक्तांना संबंधितांवर कार्यवाही करण्यासाठी अहवाल सादर केला, त्यावेळी प्रथम श्री. सचिन चवाथे (जनसंपर्क अधिकारी) यांना जा.क्र.मनपा/आस्था/३८६/२०११-१२, दि.२४/०६/२०११ अन्वये नोटीस देऊन कामावर हजर होतेवेळी सादर केलेली शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे खोटी आहेत. याबाबत खुलासा करणेस कळविले होते. त्याप्रमाणे त्यांनी केलेला खुलासा तत्कालीन मा. आयुक्त सो., यांनी दि. ०७/०७/२०११ रोजी नामंजुर केला. खुलासा नामंजुर केल्यानंतर प्रशासनाने पुन्हा मा. आयुक्त सो., यांना असमाधानकारक बाबत अहवाल सादर केला. त्या अहवालाचे अनुसार श्री. सचिन चवाथे, यांना जा.क्र.मनपा/आस्था/६०९/२०११-१२, दि.०२/०८/२०११ रोजीचे आदेशान्वये महानगरपालिका सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.

➢ याप्रकरणी फिर्यादी श्री. इंद्रिच डॉमनिक मिरांडा यांनी श्री. सचिन चवाथे व इतर पाच याचेविरुध्द भाईंदर पोलिस ठाणे येथे एम.गुन्हा नोंद क्र. ०६/२०११ भा.द.वि.स. कलम ४२०,४६३,२१७,२१८,१२० (ब), सह मु.पो.का.कलम ६४,१४५ प्रमाणे दिनांक २१/०७/२०११ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे. याप्रकरणी भाईंदर पोलिस ठाणे यांचेकडुन मा.न्यायालयात दोषारोप पत्र रवाना करणेत आले असुन, सदरची केस न्यायालयात प्रलंबित आहे.

महानगरपालिकेचा एखादा अधिकारी किंवा कर्मचारी यांनी नियमांचा किंवा शिस्तीचा भंग केल्याबद्दल किंवा निष्काळजीपणा केल्याबद्दल अथवा गैरवर्तुणक व दोषी आहे अशी खात्री झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ अन्वये संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यास मा.आयुक्त यांना शास्ती लावण्याचे अधिकार प्राप्त आहेत. सदर कलमामध्ये बडतर्फ करण्याची शास्तीची तरतुद आहे.

श्री.सचिन चवाथे यांनी ''जनसंपर्क अधिकारी'' या पदाच्या नेमणुकीकरीता दिलेल्या शैक्षणिक व इतर अर्हता, पात्रता कागदपत्रांपैकी पटना विश्वविद्यालय, पटना यांचेकडील पत्रकारीता व जनसंज्ञापन या अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र खोटे आढळल्याने, त्यांचेवर उक्त अधिनियमातील तरतुदी मधील प्राप्त अधिकार अन्वये बडतर्फ करण्याची कारवाई करण्यात आलेली असुन ती योग्य आहे. सबब अर्जदार श्री. सचिन चवाथे यांचा सेवेत पुन्हा रुजु करुन घेण्याचा अपील अर्ज/विनंती अर्ज फेटाळण्यात यावा.

(सुभाष लाखे) २०/८/१४
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

O/C

\\atul-pc\E\आस्थापना विभाग\sadar\sadar-sachin chavathe.doc8

17-35

गोपदारा प्राप्त दि. ०३/१२/२०१५ वेळ १२:३५
मा. स्थायी समिती / ~~[illegible]~~
नोंद रजिस्टर अ. क्र. १०८

लिपिक ०३/१२/१५
नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ०८ / ०१ /२०१६

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र.१२४:- ASRTU यांचे दर करारानुसार Electronic Ticketing Machine खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमांतर्गत JnNURM-II योजने अंतर्गत मंजूर झालेल्या व खरेदी केलेल्या १०० बसेस पैकी २८ बसेस दि. २५/१०/२०१५ पासून मिरा भाईंदर महानगरपालिकेने ठोक मानधनावर बसचालक व वाहक उपलब्ध करून घेऊन स्वतः चालविणेचा निर्णय घेऊन प्रत्यक्ष चालविणेत येत आहेत.

मिरा भाईंदर परिवहन उपक्रमांतर्गत चालविण्यात येणाऱ्या बसेससाठी तिकिटे छपाई करून घेणे आवश्यक आहे. तुर्तास ही तिकिटे सद्यस्थितीतील बस ऑपरेटर मे. केस्ट्रेल इन्फ्रा. प्रा. लि. यांचेकडून उपलब्ध करून घेणेत आलेली आहेत. परंतू ही तिकिटे Manually हाताळली जात असल्यामुळे त्यात काही त्रुटी राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच ह्या तिकिटांचा दैनंदिन हिशोब ठेवणे व ताळमेळ घेणे हे सुध्दा जिकिरीचे काम असल्याने त्यासाठी बराचसा मनुष्यबळ ही लागणार आहे. तथापि, Intelligat Transport System DPR नुसार Manually तिकिटांऐवजी Handheld Ticket Machines द्वारे ही तिकिटे उपलब्ध करून घेणे जास्त सुलभ होणार आहे. सदरकामी दि. २९/१०/२०१५ रोजी E-Tendaring द्वारे निविदा मागविणेत आलेल्या होत्या, परंतू मुदतीत दि. ३०/१०/२०१५ ते २३/११/२०१५ पयात फक्त ०१ निविदा प्राप्त झालेली आहे. दरम्यान संदर्भिय क्र. ०१ अन्वये "Association of State Road Transport Undertakings" यांचेकडील सदर Ticketing Machines चा "करार" दर उपलब्ध आहे. सदर करारनामा हा दि. ३१/०७/२०१५ रोजीचा M/s. MICROFX Pvt. Ltd., यांचे असून त्यांचे दर मंजूर केलेले आहेत. सदर मंजूर दराप्रमाणे थेट परिवहन उपक्रमास मशिन खरेदी केल्यास वेळेचा अपव्यय टाळता येईल व सुलभ तिकिटे हिशोब ठेवता येईल. सदर कामी M/s. MICROFX Pvt. Ltd यांनी खालीलप्रमाणे दर दिलेले आहे.

| Sl No. | Description | Quantity No. | Rate Rs. | Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Automatic Data Processing Machines (Hand Held Computer) with GPS/GPRS and RFID For Bus Ticketing Application (Specification enclosed as per ASRTU) (Including 1 year Warranty) (Taxes Extra : ED : 12.5% and VAT : 5%) | 100 | 8550.00 | 855000.00 |
| 2. | AMC for 1st Year after initial Warranty (Taxes Extra : ED: 12.55% and VAT : 5%) | 100 | 1200.00 | 120000.00 |
| 3. | AMC for 2nd Year after 1st year AMC (Taxes Extra : ED: 12.5% and VAT : 5%) | 100 | 1250.00 | 125000.00 |
| | Total ETM Rate for 3 Years | 100 | 11000.00 | 1100000.00 |
| 4. | Computer software for generating all MIS Reports (Taxes Extra : Service Tax : 14.5%) | 1 | 100000.00 | 100000.00 |
| 5. | 1K RFID Cards (Taxes Extra : VAT : 5.5%) | 1 | 25.00 | 25.00 |
| 6. | SIM Card Charges (as per ASRTU Rate Contract) | 100 | 204.00 | 20400.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (Taxes Extra : VAT : 5.5%) | | | |
| 7. | One time Server Software Development Charges for receiving online date (Taxes Extra : Service Tax : 14.5%) | 1 | 200000.00 | 200000.00 |
| Total | | - | - | 1420425.00 |
| Monthly Recurring Cost : | | | | |
| 1. | SIM Card Monthly Recharge Cost (Per Month) (as per ASRTU) (Taxes Extra : Service Tax : 14.5%) | 100 | 110.00 | 11000.00 |
| 2. | Charges for monitoring the server at data Centre (Per Month) – 1 person (If Required) (Taxes Extra : Service Tax 14.5%) | 1 | 25000.00 | 25000.00 |

वरील प्रमाणे दर Handheld Ticket Machines चे असून तीत् ०३ वर्षाकरिता वॉरेटी सह दर नमूद आहेत. ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रम यांचेशी याबाबत चर्चा केलेली असता सदर उपक्रमाने देखील संदर्भिय "करार' नुसार मशिनस् खरेदी केलेल्या आहेत.

तरी सदर मशिनद्वारे काम केल्यास संबंधित कामकाजाकरिता हिशोब लिहिणेकरिता लागणारे कर्मचारी याची आवश्यकता भासणार नाही सबब सदरचे दर हे "करार" मार्फत मंजूर असल्याने आवश्यकतेनुसार खरेदी करणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड ५(२)(२) अन्वये मंजूरीस शिफारस आहे.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. २८/१२/२०१५ वेळ ०१:१०
मा. स्थायी समिती / [illegible]
नोंद रजिस्टर अ. क्र. ११५
लिपिक
नगरसचिव विभाग.

# मा. स्थायी समिती सभा दि.०८।०१।२०१६

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक(१२५)** भाईंदर (प.) राईगांव येथील मैदानासमोर तळ + १ मजल्याचे रंगमंच बांधकाम करणेच्या सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील राई गांव येथील अरुणकुमार वैद्य मैदानासमोर तळ मजल्यावर रंगमंच व पहिल्या मजल्यावर व्यायाम शाळा बांधणे कामासाठी रु.२४,३२,१००/- इतक्या रकमेची निविदा प्रसिध्द करून कंत्राटदार मे. तुषार इंटरप्रायझेस यांना कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

परंतु प्रत्यक्ष कामास सुरुवात केली असता लोकप्रतिनिधींना सदर रंगमंच बांधकाम करण्याबाबत काही सुचना केलेल्या आहेत. त्यानुसार रंगमंचाच्या आराखड्यात रंगमंच्यालगत दोन्ही बाजुस ड्रेसिंग खोलीचे बांधकाम करणे व रंगमंचाची रुंदी वाढविणे इत्यादी बदल करण्यात आलेले आहेत. नविन आराखड्यानुसार अंदाजपत्रकामध्ये वाढ होणार असून रु.३३,१९,४००/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

तरी भाईंदर (प.) राईगांव येथील मैदानासमोर तळ + १ मजले रंगमंचाचे नविन आराखड्यानुसार सुधारीत रु.३३,१९,४००/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC 2//DK/2015-16/SG -11

गोषवारा प्राप्त दि. ०८/१२/२०१५ वेळ ११:४०

मा. स्थायी [illegible] गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. १०८

लिपिक

नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ०८/०९/२०१६

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (१२६) :-** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) साई दत्त तलाव (सुकाळ तलाव) येथील कुंपणभिंत बांधणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) साई दत्त तलाव (सुकाळ तलाव) येथे खासदार निधीमार्फत तलाव सुशोभिकरण करणे जॉगींग ट्रॅकचे काम प्रस्तावित आहे. सदर ठिकाणी सद्यास्थितीत जॉगींग ट्रॅक साठी खोदकाम करण्यात आलेले आहे. खोदकामाच्या वेळी सदर ठिकाणी असलेली पूर्वीची कुंपणभिंत कमकुवत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच काही ठिकाणी भिंत ही खचत आलेली आहे. सदर ठिकाणाची छायाचित्र सोबत जोडण्यात आलेले आहे. मा. स्थानिक नगरसेवक, श्री. प्रभाकर म्हात्रे यांनी सदर कुंपणभिंत बांधण्याबाबत कळविले आहे. तसेच सदर कामाबाबात मा. श्री. राजन विचारे, खासदार पाठपुरावा करीत आहेत. सदर कुंपणभिंत ही जॉगींग ट्रॅक बनविण्याच्या अगोदर बांधणे योग्य होईल जेणेकरुन जॉगींग ट्रॅक कुंपणभिंती बांधण्याच्या कामास व्यत्यय होणार नाही. सदर कामासाठी रु.३६,२४,१००/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

तरी मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) साई दत्त तलाव (सुकाळ तलाव) येथील कुंपणभिंत बांधण्यासाठी रु. ३६,२४,१००/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-3/PW/2015-16/SG-2

गोषवारा प्राप्त दि२८/१२/२०१५ वेळ ११:२० 
मा. स्थायी समिती / ~~महासभा~~ गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ११२
नगरसचिव विभाग.

# मा. स्थायी समिती सभा दि.०८।०१।२०१६
## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक(१२७)** भाईंदर (पूर्व) नवघर मराठी शाळेच्या आवारामध्ये आरोग्य केंद्राचे बांधकाम करणे या कामास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) नवघर मराठी शाळेच्या आवारामधील जागेमध्ये आरोग्य केंद्र बांधण्याचे मागणी संदर्भिय पत्रान्वये मा. उप महापौर श्री. प्रविण पाटील यांनी केलेली आहे. सदर मागणीच्या अनुशंगाने महानगरपालिकेच्या पॅनल वरील मे. एच.एम. राजे स्ट्रक्चरल कन्सल्टंट प्रा.लि. यांच्याकडून सदर कामाचे आराखडे व अंदाजपत्रक तयार करून घेण्यात आलेले आहे. सदर कामी रु.४७,६९,४३३/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर कामासाठी तरतुद सन २०१५-१६ च्या "उप महापौर स्वेच्छा निर्णय निधी" या लेखाशिर्षकात करण्यात आलेली असून रु.५०.०० लक्ष इतकी तरतूद उपलब्ध आहे.

तरी सदर कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC 2//DK/2015-16/SG -10

गोषवारा प्राप्त दि. २-१२/२०१५ वेळ १२:४५

मा. स्थायी समिती / ~~महासभा~~ गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. १०५

लिपिक

नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि.०८/०७/२०१६

## // गोषवारा //

प्रकरण क्रमांक ( १२८ ) :- निविदांना मान्यता देणे.

| अ क्र | टेंडर आय डी क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर | मा.आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | मा. समिती शिफारस दिनांक | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ |
| १ | २३३०६ | प्रभाग क्र. ४२ (अ) मधील नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी अंतर्गत विविध ठिकाणी गटार बांधणे. | रु. ३८,३०,८५०/- | दि.३१/०७/२०१५ | दि.३०/११/२०१५ | दै. मुंबई चौफेर / मुंबई लक्षद्विप दि.०२/१०/२०१५ | दि.०५/१०/२०१५ |
| | | मे. सालासर कंस्ट्रक्शन कं. | १.११ % कमी दराने<br>**दरघाटाघाटीनंतर १.११ % कमी दराने** | | | | |
| | | मे. श्री गणेश इंटरप्रायझेस | १०.००%जास्त दराने | | | | |
| | | मे. एस.एम. कंस्ट्रक्शन | १०.००%जास्त दराने | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | २३२४४ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. ११ (अ) मधील नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधीमधुन गटार व रस्ता बनविणे इत्यादी विकास कामे करणे.<br>(दोन मुदतवाढी)<br><br>मे. आर.एस. कंस्ट्रक्शन<br><br>मे. श्री पाटील असोसिएट्स | रु. ३८,२३,२००/-<br><br>३.७७ % कमी दराने<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**३.७७ % कमी दराने**<br>**अंदाजपत्रकिय दराने** | दि.१२/०८/२०१५ | दि.३०/११/२०१५ | दै. मुंबई चौफेर, मुंबई लक्षद्विप दि.०४/०९/२०१५ | दि.०९/०९/२०१५ |
| ३ | २३२७६ | भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र. १३ मधील जनसेवा बँकेपासून न्यू गोल्डन नेस्टच्या पाठीमागे गेटकडे जाणारा नाला बांधणे<br><br>मे. राठोड ब्रदर्स<br><br>मे. राठोड असोसिएट्स<br>मे. एन.एस. इंटरप्रायझेस | रु. ४७,७३,८५०/<br><br>०.५१ % कमी दराने<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**०.५१ % कमी दराने**<br>८.०० %जास्त दराने<br>१२.०० %जास्त दराने | दि.२५/०८/२०१५ | दि.३०/११/२०१५ | दै. हमारा महानगर / परशुराम समाचार दि.१५/९/२०१५ | दि.१९/०९/२०१५ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २३२९८ | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. १२२ या जागेत अग्निशमन केंद्र इमारत बांधणे.<br><br>**मे. गजानन कंस्ट्रक्शन**<br><br><br><br><br>मे. श्री जी कंस्ट्रक्शन<br>मे. अस्फाल्ट इंडिया कॉर्पोरेशन | रु. १,२५,००,०००/-<br><br>२५.००% जास्त दराने<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**२२.०० % जास्त दराने**<br>(चालू जिल्हादरसुचीतील दरापेक्षा ९.५६ % जास्त दराने<br>३०.०० % जास्त दराने<br>३१.०० %जास्त दराने | दि.०५/०६/२०१५ | दि.३०/११/२०१५ | खबरे आजतक / आफ्टरनुन दि.३०/०९/२०१५ | दि.३०/०९/२०१५ |
| ५ | २३२९९ | मिरारोड (पूर्व) सिल्व्हर पार्क मार्केट इमारत बांधणे.<br><br>**मे. गजानन कंस्ट्रक्शन**<br><br><br><br><br>मे. श्री जी कंस्ट्रक्शन<br>मे. अस्फाल्ट इंडिया कॉर्पोरेशन | रु.१,३७,८९,७००/-<br><br>२५.०० % जास्त दराने<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**२४.०० % जास्त दराने**<br>(चालू जिल्हादरसुचीतील दरापेक्षा ४.४० % जास्त दराने<br>२८.०० % जास्त दराने<br>३२.०० %जास्त दराने | दि.०५/०६/२०१५ | दि.३०/११/२०१५ | खबरे आजतक / आफ्टरनुन दि.३०/०९/२०१५ | दि.३०/०९/२०१५ |

वरील कामाच्या कमी दराच्या निविदांना मान्यता देण्यास शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

PC-5/15-16/DK/SG/18

गोषवारा प्राप्त दि१५/१२/२०१५ वेळ ११:३५
मा. स्थायी समिति [illegible]
नोंद रजिस्टर अ. क्र. ११०
नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि.०८/०७/२०१६

## // गोषवारा //

प्रकरण क्रमांक (७२९) :- निविदांना मान्यता देणे.

| अ क्र | टेंडर आय डी क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर | मा.आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | मा. समिती शिफारस दिनांक | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ |
| १ | २३३०८ | प्रभाग क्र. ४६ (अ) मधील नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी अंतर्गत शौचालय व कॉक्रींट रस्ता बनविणे.<br>मे. मुस्कान इंटरप्रायझेस<br><br>मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br>मे. वि.जे. कॉर्पोरेशन | रु. ३८,३०,७००/-<br><br>अंदाजपत्रकिय दराने<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**०.२० % कमी दराने**<br>३.०० % जास्त दराने<br>५.०० %जास्त दराने | दि.२४/८/२०१५ | दि.२३/११/२०१५ | दै. मुंबई चौफेर / लक्षद्विप<br>दि.०२/१०/२०१५ | दि.०५/१०/२०१५ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | २३३०७ | **प्रभाग क्र. ४५ (अ) मधील नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी अंतर्गत विविध ठिकाणी गटार बनविणे, गटाराचे स्लॅब दुरुस्त करणे, चेकर्ड टाईल्स लावणे इत्यादी कामे करणे.**<br><br>**मे. अष्टविनायक बिल्डकॉन**<br><br>मे. गजानन कंस्ट्रक्शन<br>मे. एम.एस. इंटरप्रायझेस | रु. ३८,२९,१००/-<br><br>१३.००% कमी दराने<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**१३.००% कमी दराने**<br>अंदाजपत्रकिय दराने<br>५.०० % जास्त दराने | दि.२४/८/२०१५ | दि.२३/११/२०१५ | दै. मुंबई चौफेर / लक्षद्विप<br>दि.०२/१०/२०१५ | दि.०५/१०/२०१५ |
| ३ | २३३०९ | **प्रभाग क्र. ४६ (ब) मधील नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी अंतर्गत रस्ता ग्राऊटींग करणे व कॉक्रीट रस्ता बनविणे.**<br><br>**मे. रिध्दीका इंटरप्रायझेस**<br><br>मे. आशापुरा कंस्ट्रक्शन<br>मे. गणेश डेव्हलोपर्स | रु. ३८,३५,१००/-<br><br>०.०५ % कमी दराने<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**०.१०% कमी दराने**<br>३.९ % जास्त दराने<br>५.२५ % जास्त दराने | दि.३१/७/२०१५ | दि.२३/११/२०१५ | दै. मुंबई चौफेर / लक्षद्विप<br>दि.०२/१०/२०१५ | दि.०५/१०/२०१५ |
| ४ | २३३०२ | **प्रभाग क्र. ४० (ब) मधील नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी अंतर्गत विविध ठिकाणी सी.सी. गटार व सी.सी. रस्ता बनविणे.**<br>**मे. एम.एस. इंटरप्रायझेस**<br><br>मे. निलेश रणदिवे<br>मे. श्री गणेश इंटरप्रायझेस | रु. ३८,२७,६००/-<br><br>०.०१ % कमी दराने<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**०.१५ % कमी दराने**<br>३.९ % जास्त दराने<br>५.२५ % जास्त दराने | दि.३१/७/२०१५ | दि.२३/११/२०१५ | दै. मुंबई चौफेर / लक्षद्विप<br>दि.०२/१०/२०१५ | दि.०५/१०/२०१५ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | २३३०३ | प्रभाग क्र. ४२ (ब) मधील नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी अंतर्गत विविध ठिकाणी गटार बांधणे, बस स्टॉप बांधणे व वरीष्ठ नागरीकांसाठी शेड बांधणे इत्यादी कामे करणे.<br>मे. मुस्कान इंटरप्रायझेस<br><br>मे. वि.जे. कॉर्पोरेशन<br>मे. एम.एस. इंटरप्रायझेस | रु. ३८,२७,५५०/-<br>अंदाजपत्रकिय दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>०.२० % कमी दराने<br>५.०० % जास्त दराने<br>३.००% जास्त दराने | दि.३१/७/२०१५ | दि.२३/११/२०१५ | दै. मुंबई चौफेर / लक्षद्विप<br>दि.०२/१०/२०१५ | दि.०५/१०/२०१५ |
| ६ | २३३१२ | प्रभाग क्र. ४४ (ब) मधील नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी अंतर्गत विविध ठिकाणी गटार बांधणे.<br>मे. रिध्दीका इंटरप्रायझेस<br><br>मे. आशापुरा कंस्ट्रक्शन<br>मे. गणेश डेव्हलोपर्स | रु. ३८,३१,९००/-<br>०.०५ % कमी दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>०.१० % कमी दराने<br>३.८ % जास्त दराने<br>५.१ % जास्त दराने | दि.३१/७/२०१५ | दि.२३/११/२०१५ | दै. मुंबई चौफेर / लक्षद्विप<br>दि.०२/१०/२०१५ | दि.०५/१०/२०१५ |
| ७ | २३३०५ | प्रभाग क्र. ४१ (ब) मधील नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी अंतर्गत गटार व स्टेनलेस स्टीलचे बस स्टॉप बांधणे.<br>मे. कंचन कंस्ट्रक्शन<br><br>मे. राठोड ब्रदर्स<br>मे. राठोड असोसिएट्स | रु. ३८,३३,२००/-<br>०.१८ % कमी दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>०.१८ % कमी दराने<br>५.०० % जास्त दराने<br>४.०० % जास्त दराने | दि.३१/७/२०१५ | दि.२३/११/२०१५ | दै. मुंबई चौफेर / लक्षद्विप<br>दि.०२/१०/२०१५ | दि.०५/१०/२०१५ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | २३३११ | प्रभाग क्र. ४७ (ब) मधील नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी अंतर्गत विविध ठिकाणी गटार व सी.सी. रस्ते बनविणे.<br>मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br>मे. निलेश रणदिवे<br>मे. श्री गणेश इंटरप्रायझेस | रु. ३८,३०,२००/-<br>०.०१ % कमी दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>**०.१५ % कमी दराने**<br>५.०० % जास्त दराने<br>४.०० % जास्त दराने | दि.३०/७/१५ | दि.२३/११/२०१५ | दै. मुंबई चौफेर / लक्षद्विप<br>दि.०२/१०/२०१५ | दि.०५/१०/२०१५ |
| ९ | २३३१० | प्रभाग क्र. ४७ (अ) मधील नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी अंतर्गत विविध ठिकाणी गटार बनविणे व रस्ता सी.सी. करणे.<br>मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br>मे. निलेश रणदिवे<br>मे. श्री गणेश इंटरप्रायझेस | रु. ३४,३४,५००/-<br>०.०१ % कमी दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>**०.१५ % कमी दराने**<br>६.०० % जास्त दराने<br>६.०० % जास्त दराने | दि.३१/७/२०१५ | दि.२३/११/२०१५ | दै. मुंबई चौफेर / लक्षद्विप<br>दि.०२/१०/२०१५ | दि.०५/१०/२०१५ |
| १० | २३३०४ | प्रभाग क्र. ४१ (अ) मधील नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी अंतर्गत विविध ठिकाणी गटार बांधणे.<br>मे. कंचन कंस्ट्रक्शन<br>मे. राठोड ब्रदर्स<br>मे. राठोड असोसिएट्स | रु. ३८,३०,१००/-<br>०.१८ % कमी दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>**०.१८ % कमी दराने**<br>५.०० % जास्त दराने<br>४.०० % जास्त दराने | दि.२९/८/२०१५ | दि.२३/११/२०१५ | दै. वार्ताहर / जनादेश<br>दि.०४/१०/२०१५ | दि.०५/१०/२०१५ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | २३३२५ | **रा.म.क्र. ०८ वर ग्रीन व्हीलेज ते मनाली व्हीलेज पर्यंत गटार बांधणे**<br>**मे. मुस्कान इंटरप्रायझेस**<br><br>मे. सालासर कंस्ट्रक्शन<br>मे. स्पार्क सिव्हील इन्फ्राप्रोजेक्ट<br>मे. एकता कंस्ट्रक्शन<br>मे. राठोड असोसिएट्स<br>मे. रिध्दीका इंटरप्रायझेस<br>मे. आर.एस. कंस्ट्रक्शन | **रु.६२,५०,०००/-**<br>१५.१९ %कमी दराने<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**१५.१९% कमी दराने**<br>१३.०१ % कमी दराने<br>१२.८८ % कमी दराने<br>१२.८५ % कमी दराने<br>१३.५२ % कमी दराने<br>१४.२१ % कमी दराने<br>१३.७७ % कमी दराने | दि.२३/९/२०१५ | दि.२३/११/२०१५ | दै. वार्ताहर / जनादेश<br>दि.०४/१०/२०१५ | दि.०८/१०/२०१५ |
| १२ | २३३४० | **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात निर्मल एम.एम.आर. अभियान अंतर्गत बांधण्यात आलेल्या शौचालयामध्ये मोटर पंप (प्रेशर पंप) बसविणे व इतर आवश्यक कामे करणे.**<br><br>**मे. शेखर इलेक्ट्रीकल्स**<br><br>मे. आदित्य इलेक्ट्रीकल्स<br>मे. ए.के. इलेक्ट्रीकल इंजिनिअर्स | रु. ८६,३६,८८६/-<br><br>०.२ % कमी दराने<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**०.२ % कमी दराने**<br>७.९ % जास्त दराने<br>१०.०० % जास्त दराने | दि.२८/९/२०१५ | दि.२३/११/२०१५ | दै. हमारा महानगर / मुंबई मित्र<br>दि.२०/१०/२०१५ | दि.१९/१०/२०१५ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | २३३३७ | भाईंदर (पूर्व) इंद्रलोक फेस – ३ क्रिष्णा गीता इमारत ते मुनिष पेटल रस्त्याच्या दोन्ही बाजुस गटार बांधणे . | रु. ४२,६२,१५०/- | दि.१४/१०/२०१५ | दि.२३/११/२०१५ | दै. हमारा महानगर / मुंबई मित्र दि.२०/१०/२०१५ | दि.१९/१०/२०१५ |
| | | मे. साई कंस्ट्रक्शन | १५.३ % कमी दराने दरवाटाघाटीनंतर | | | | |
| | | मे. सालासर कंस्ट्रक्शन | १५.३ % कमी दराने | | | | |
| | | मे. मुस्कान इंटरप्रायझेस | १२.१२ % कमी दराने | | | | |
| | | मे. राठोड असोसिएट्स | १४.२९ % कमी दराने | | | | |
| | | मे. आर.एस. कंस्ट्रक्शन | १३.१४ % कमी दराने | | | | |
| | | मे. रिध्दीका इंटरप्रायझेस | १३.७७ % कमी दराने | | | | |
| | | मे. नरेश कंस्ट्रक्शन | १४.२१ % कमी दराने<br>१४.६५ % कमी दराने | | | | |
| १४ | २३३२४ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्ट्रीट लाईट पोल वार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणे. | रु. ८४,७८,४४४/- | दि.७/७/२०१५ | दि.२३/११/२०१५ | दै. वार्ताहर / जनादेश दि.०४/१०/२०१५ | दि.०८/१०/२०१५ |

| | | | | M/s. Shekhar Electrical |
|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Item** | **Qty** | **Unit** | **Rate** |
| 1. | Operation and maintenance of Street lighting installation having 70W/150W/250W HPSV fixtures and lamps filled on tublar poles with the Contractor material and manpower. The day to day works include the replacement of HPSV fixtures / fitting, blubs chockes, ignitor accessories related to HPSV fixtures / fittings, contactors, times (faulty photo switches should be replaced by timers) accessories related to control gear, | 1 | Each | **319**<br>**दरवाटाघाटीनंतर**<br>**317** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | fuses, wires, PVC cables, bracket clamps, sealing and boxes, control boxes and location and rectification of cable faults replacing entire faulty repairing of non functioning installation. 'ON and OFF' of street lights at designated times. The contractors should be responsible for keeping at least 95% of the installations in functioning mode by using their materials, manpower, (2363 installation) | | | |

वरील कामाच्या कमी दराच्या निविदांना मान्यता देण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-5/15-16/DK/SG/17

गोषवारा प्राप्त दि. 2/12/2015 वेळ 12.45

मा. स्थायी समिती / [illegible] गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. [illegible]

लिपिक

नगरसचिव विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगरसचिव विभाग

## मा. स्थायी समिती सभा दि.०८/०१/२०१६

## // गोषवारा //

**प्रकरण क्र.१३०:-** निवीदेस मान्यता मिळणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन्मा. सदस्य तसेच अधिकारी / कर्मचारी यांचेकरिता म्हैसुर येथे अभ्यास दौरा आयोजित करणेसाठी तसेच या अभ्यास दौऱ्याकरिता ट्रॅव्हल एजन्सी नेमणेस मा. महासभा दि. ०१/०७/२०१५, ठराव क्र. २५ अन्वये मान्यता दिलेली होती.

अभ्यास दौऱ्याचे आयोजन करणे कामी ट्रॅव्हल एजन्सीची नेमणुक करणेसाठी Online E-Tendering पध्दतीने निवीदा मागविली असता एकच निवीदाधारक पात्र ठरल्याने प्रथम फेर निवीदा मागविण्यात आली होती. यावेळी देखील एकच निवीदाधारक पात्र ठरल्याने द्वितीय फेर निवीदा मागविण्यात आलेली होती. यावेळी मे. श्रीनिश इंटरप्रायजेस यांची एकच निविदा प्राप्त झालेली असून त्यांनी प्रती माणसी रक्कम रु. ७४,२५९/- इतके दर सादर केलेले आहेत. प्राप्त दर जास्तीचे असल्याने निवीदाकारास दर वाटाघाटीसाठी बोलाविले असता, दर वाटाघाटी अंती निवीदाकारांनी प्रती माणसी रक्कम रु. ६०,०००/- इतक्या दरामध्ये अभ्यास दौऱ्याचे आयोजन करणेचे मान्य केले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन्मा. सदस्य तसेच अधिकारी / कर्मचारी यांचेकरिता म्हैसुर येथे अभ्यास दौऱ्याचे आयोजन करणेकामी मे. श्रीनिश इंटरप्रायजेस यांच्या वाटाघाटीअंती प्राप्त निवीदेस स्विकारणेस मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. ०८/०१/२०१६
## सार्व. आरोग्य विभाग
## // गोषवारा //

**प्रकरण क्र. :- १३१ मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)**

मिरा भाईंदर महानगरपालिका मौजे उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी जमा होणाऱ्या कचऱ्यावर पावडर फवारणी कामी हर्बल पावडर व Basilo (H.C) Liquid पुरवठा कामाचे दि.२/१२/२०१५ रोजी नोटीस बोर्डावर कोटेशन नोटीस प्रसिध्द करून दि. ११/१२/२०१५ रोजी दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यास प्रतिसाद मिळून खालीलप्रमाणे कोटेशन धारकांनी मुदतीत दरपत्रक सादर केले आहेत. प्राप्त दरपत्रकापैकी कमी दराचे कोटेशन धारक मे. ओम हायजेनीक प्रोडक्ट्स यांनी सादर केलेले दर जादा असल्याने दि. १९/१२/२०१५ रोजी वाटाघाटी करून खालीलप्रमाणे दर कमी केले आहेत. त्यास मा.आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

| क्र. | कामाचा तपशिल | वाटाघाटी नंतर सादर केलेले दर | अंदाजीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | हर्बल पावडर पुरवठा करणे | रु. १२०/- प्रती किलो | रु. २,००,०००/- |
| २ | Basilo (H.C) Liquid पुरवठा करणे | रु. १८००/- प्रती लिटर | रु. २,००,०००/- |

उपरोक्त कामाचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

आयुक्त,
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि.२९/१२/२०१५ वेळ ११:२३ वा.
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ११४

लिपिक
नगरसचिव विभाग.